(2)

K. M. S. P. MANDAL'S
Contact : 86556 71883

**SETH ISHWARDAS HARIDAS BHATIA HIGH SCHOOL & JUNIOR COLLEGE**

Wadia Estate Colony, Bail Bazar, Kurla (W), Mumbai - 400 070.

o. BHS/

U- DISE No. 27230400129
INDEX NO. Jr. College - 33.01.006
High School - 33.01.037

Date :

पालक-शिक्षक संघ सभा
दिनांक: १५.११.२०२४

प्रति,

पालक-शिक्षक संघ सदस्य
श्री. हळदणकर प्र.

विषय:- पालक-शिक्षक संघाच्या बैठकीची सूचना

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ (२०१४ चा महा. ७) यांच्या कलम ४ (२)(च) आणि महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) नियम, २०१६ च्या नियम ४(२) मधील तरतुदीनुसार पालक-शिक्षक संघाची बैठक बुधवार दिनांक ०४.१२.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता वर्ग खोली क्र. ३७ येथे आयोजित केलेली आहे.

बैठकीची विषय पत्रिका सोबत जोडली आहे. आपणास विनंती करण्यात येते की, आपण बैठकीस वेळेवर उपस्थित राहावे. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) नियम, २०१६ याच्या नियम ४(४) मधील तरतुदीनुसार एकूण सदस्य संख्येच्या किमान दहा टक्के सदस्य उपस्थित असतील तरच बैठकीचे कामकाज सुरु करण्यात येईल. जर उपस्थिती कमी असेल, तर पालक-शिक्षक संघाचे अध्यक्ष बैठक अर्ध्या तासाकरिता तहकूब करतील. गणपूर्ती पूर्ण नाही झाली तर, सभा रद्द करण्यात येईल आणि नियमातील कार्यपद्धतीनुसार १५ दिवसांनी बैठक पुन्हा बोलाविण्यात येईल.

आपला विश्वासू,
सचिव,
श्री. संतोष शिंदे
(पालक-शिक्षक संघ)

---

(3)

**क. म. शि. प्र. मंडळाचे शे. ई. ह. भाटिया हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज**
**वाडिया इस्टेट, बैल बाजार कुर्ला ४०० ०७०.**

**<u>पालक शिक्षक संघ सभा क्रमांक</u> - २**

दि. १५-११-२०२४

**सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील पालक शिक्षक संघ सभा बुधवार दिनांक ०४/१२/२०२४ रोजी दुपारी ठीक १२. ०० वाजता वर्ग खोली क्र. ३७ येथे आयोजित केली आहे. तरी या आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.**

**सभेपुढील विषय :-**

**१) मागील सभेचे इतिवृत्त वाचन करणे.**

**२) शालेय शिस्त व स्वच्छतेबाबत.**

**३) स्वयं अर्थसहाय्यित विभागाच्या वार्षिक फी वाढीबाबत निर्णय घेणेबाबत .**

**४) १४ फेब्रुवारी २०२५ शाळा वर्धापन दिन साजरा करणेबाबत.**

**५) अध्यक्षांचे परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय.**

**आपला विश्वासू**
**(श्री. संतोष शिंदे)**
**सचिव**
**पालक शिक्षक संघ**